राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक
महासत्ता
शनिवार दि. ०६ ऑक्टोबर २०१८

# जादू चमत्कार नसून कला आहे-जावेद

**गारगोटी, ता. ५(प्रतिनिधी)**

जादू हि चमत्कार नसून एक स्वतंत्र कला आहे. विज्ञानातील साध्या, सरळ व सोप्या युक्त्या वापरून आणि कौशल्याच्या जोरावर अनेक लोक जादूचे प्रयोग करून लोकांना चकित करतात. विज्ञानातील या सोप्या युक्त्यांचा सराव केल्यास जादुगार होणे सहजसाध्य आहे. जादूची कला मनोरंजनासह व्यवसायाचा उत्तम स्त्रोत ठरू शकते, असे प्रतिपादन नागपूर येथील प्रसिद्ध जादु कलाकार सय्यद जावेद यांनी येथे केले.

ते येथील मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालयातील विवेक वाहिनीतर्फे आयोजित जादुमागील विज्ञान' कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे होते.

या कार्यक्रमास डॉ. विलास जगताप, प्रा. राहुल चित्रकार, प्रा. विशाल आहेर, प्रा. चंद्रकांत चव्हाण, प्रा. श्रीकांत देसाई आदी उपस्थित होते. प्रास्तविक डॉ. सागर व्हनाळकर यांनी केले. सुत्रसंचालन विवेक वाहिनी प्रमुख प्रा. चेतन भगत यांनी केले. आभार प्रा. सुरेश राजरत्न यांनी मानले.